**शबरी आदिवासी घरकूल योजनेतंर्गत लाभार्थ्यांसाठी असलेली दारिद्रय रेषेच्या खालील लाभार्थी असण्याची अट अपंग लाभार्थ्यांसाठी शिथिल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्र. : घरकूल २०१५/ प्रक्र.२१०/ का-१७
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई ४०००३२
दिनांक : ०५ जानेवारी,२०१६

<u>वाचा</u>: १. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. घरकूल २०१२/ प्रक्र ३८ (भाग- १)/ का-१७, दिनांक २८.०३.२०१३
२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. घरकूल २०१२/ प्रक्र ३८ (भाग- १)/ का-१७, दिनांक ०७.०८.२०१४

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी शासनाने शबरी आदिवासी घरकूल योजना, शासन निर्णय दिनांक २८.०३.२०१३ अन्वये सुरु केली आहे. या योजनेमध्ये, शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०१४ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अटी व शर्तीमध्ये प्रामुख्याने लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील असावा ही अट आहे. अनुसूचित जमातीच्या घटकांतील अपंगांकरीता ते दारिद्रय रेषेखालील नसल्यामुळे अनेक वेळा त्यांना घरकुलाचा लाभ देणे शक्य होत नाही. त्यामुळे अनुसूचित जमातीतील अपंग लाभार्थ्यांसाठी ते दारिद्रय रेषेखालील असण्याची अट शिथील करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला आहे. त्यास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शबरी आदिवासी घरकूल योजनेत अपंग लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ग्रामीण भागामध्ये शबरी आदिवासी घरकूल योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळणेकरीता अनुसूचित जमातीमधील जे अपंग लाभार्थी दारिद्रय रेषेखाली नाहीत, ज्यांचे अपंगत्व ४० % पेक्षा अधिक आहे व त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत आहे, अशा अपंग लाभार्थ्यांना, ते योजनेच्या उर्वरित अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास, त्यांना शबरी आदिवासी घरकूल योजनेचा लाभ देण्यात यावा.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६०१०५१६३२३३१०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DESHMUKH GAJANAN RAMDAS

Digitally signed by DESHMUKH GAJANAN RAMDAS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL,CID - 919374, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DESHMUKH GAJANAN RAMDAS
Date: 2016.01.05 17:17:17 +05'30'

**( गजानन रा. देशमुख )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. विरोधी पक्षेनेता, विधानसभा / विधानपरिषद , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा.मंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव
६) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) मा. मुख्यसचिव
८) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक
९) प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१०) प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
११) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय.
१२) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१३) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा कुर्ला संकुल,मुंबई.
१४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रत्रविकास प्राधिकरण, वांद्रे (पू.) मुंबई.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) सर्व मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य
१७) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१९) सर्व विभागीय आयुक्त
२०) सर्व जिल्हाधिकारी
२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व महानगरपालिका आयुक्त
२३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे

२४)आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५)आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२६)अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर
२७)सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
२८)सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
२९)सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग
३०)संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
३१)वित्त विभाग (व्यय-१४/अर्थोपाय,) मंत्रालय, मुंबई.
३२)सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३३)निवड नस्ती-कार्यासन १७, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.